निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६७ वा.
सोमवार :०१ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

राज्यातील २२ नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई /प्रतिनिधी/राज्यातील २२ नगरपरिषदांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुका पुढे ढकलल्या आहे. गेल्या दोन आठवड्यापासून जिथं प्रचाराचा धुरळा उडत होता. तिथं अचानक निवडणूक लांबल्यामुळे कार्यकर्ते आणि उमेदवारांच्या उत्साहावर पाणी फेरलं गेलंय. जिथं जिथं निवडणूक पुढे ढकलली तिथल्या निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर झालाय. जिथं जिथं निवडणूक पुढे ढकलली तिथं आता २० डिसेंबरला मतदान होईल आणि २१ तारखेलाच मतमोजणी होणार आहे. उर्वीरत ठिकाणांच्या निवडणुका मात्र ठरल्याप्रमाणे २ डिसेंबरला नियोजित वेळत पार पडणार आहे.

मराठवाड्यात १७ पालिकांच्या कार्यक्षेत्रातील ३८ प्रभागांची निवडणूक लांबणीवर-

मराठवाड्यात ८ जिल्ह्यांमधील १७ पालिकांच्या कार्यक्षेत्रातील ३८ प्रभागांची निवडणूक लांबणीवर पडली. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे संबंधिक उमेदवारांनी अर्ज छाननीत आक्षेप घेतले होते. अधिकाऱ्यांचा निर्णय संबंधितांना मान्य नव्हता. त्यामुळे उमेदवारांनी कार्टात धाव घेतली होती. न्यायालयात या हरकतींचा निकाल २३नोव्हेंबरनंतर लागला. तो पथका अर्ज माघारीची मुदत निधून गेली होती. तसेच चिन्ह वाटपाच्या प्रक्रियेला विलंब झाला. त्यामुळे संबंधितांना प्रचाराल वेळ कमी मिळाला. म्हणून राज्य निवडणूक निवडणुका पुढे ढकलण्याचे निर्देश दिले आहे.

निवडणुकांच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला नगरपलिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. आज रात्री १० वाजता प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह सर्वच बड्या नेत्यांच्या आज सभा पार पडणार आहेत. मुख्यमंत्र्यांची संभाजीनगर, पुणे, नाशिक, अहिल्यानगर, बीडमध्ये सभा होणार आहे तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नाशिकच्या त्रंबकेश्वर, संभाजीनगरमध्ये तर अजित पवारांच्या पुणे जिल्ह्यसह नाशिकच्या भगूरमध्ये सभा होणार आहे. त्यामुळे प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस कसा गाजतो ते पाहावं लागेल.

कुठे संपूर्ण निवडणुका दुसऱ्या टप्प्यात होणार?

पुणे जिल्ह्यातील बारामती, लातूर जिल्ह्यातील रेणापूर, सोलापूरमधील मंगळवेढा, अनगर, सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, फलटण, यवतमाळ नगरपालिका, वाशिम नगरपालिका, चंद्रपूरमधील घुग्गुस, वर्धामधील देवळी, बुलढाणामधील देऊळगावराजा, अकोला जिल्ह्यातील बाळापूर, हिंगोली जिल्ह्यातील वसमत, नांदेड जिल्ह्यातील मुखेड आणि धर्माबाद, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री, जिल्ह्यातील अंबरनाथ, अहिल्यानगरमधील कोपरगाव, देवळाली, नेवासा, पाथर्डी.

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त नागपूरात भव्य कार्यक्रम

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई /प्रतिनिधी/'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या प्रमुख उपस्थितीत एक कार्यक्रम होणार आहे.

राज्य प्रदर्शनी समितीच्या बैठकीत श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या छायाचित्रासह भारतीय डाक विभागामार्फत स्मृतिचिन्ह म्हणून टपाल तिकीट जारी करण्याचा निर्णय घेतला.

७ डिसेंबर रोजी नागपूर येथील सुरेश चंद्र सुरी ग्राउंड, जरीपटका पोलीस स्टेशन रोड, नारा येथे सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय प्रदर्शनी समितीची बैठक मुंबईत नुकतीच झाली. यावेळी नियोजनाबाबत चर्चा आणि प्रदर्शनाचे सादरीकरण करण्यात आले.

बैठकीस कोकण भवनचे अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा समिती सदस्य रविंद्र पवार, राज्य पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष तथा समितीचे निमंत्रक व कार्याध्यक्ष बल मलकित सिंह, समन्वयक तथा कार्यकारी अधिकारी डॉ. जगदिश साकवान, समितीचे सदस्य लढाराम नागवाणी, डॉ.कुलतारसिंह चीमा , जयराम पवार , श्रीनिवास पुलैया, रवींद्र राठोड , अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या अवर सचिव विशाखा आढाव यांच्यासह राज्यस्तरीय समन्वय समितीचे सदस्य यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शनी आयोजित करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात संतांचा इतिहास, कार्य, राष्ट्रसेवा यासंदर्भात माहिती देणारी प्रदर्शनेही उभारण्यात येतील. शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, वाल्मिकी आणि सिंधी समाज एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम करणार आहेत.

संतांच्या साहित्य आणि पुस्तकांचे विशेष प्रदर्शनही याप्रसंगी आयोजित करण्यात येणार आहे. या शताब्दी समागमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा धर्मरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरांत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

सर्वसामान्यांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा डाव!

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई /प्रतिनिधी/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वापरण्यात येणाऱ्या मतदार याद्यांचा घोळ अद्यापही कायम आहे.राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या प्रारूप याद्यांसंदर्भात तक्रारींचा पाऊस पडतोय.जोपर्यंत मतदार यादीतील घोळ आणि दुबार मतदारांची नावे कमी केली जात नाही; तोपर्यंत निवडणुकांमध्ये या याद्या वापरू नका,असे आवाहन बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव,पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी रविवारी (ता.३०) दिला.सर्वसामान्यांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा हा डाव असल्याचा दावा यानिमित्ताने त्यांनी केला.

भाजप १७५ ठिकाणी नगराध्यक्षपद जिंकेल,भाजपचा अंतर्गत सर्व्हे काय सांगतो?

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई /प्रतिनिधी/ महाराष्ट्रातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका अंतिम टप्प्यात पोहोचल्या असताना भाजपच्या अंतर्गत सर्व्हेने निर्माण केलेली चर्चा अधिकच तापू लागली आहे.

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायत निवडणुकांसाठी काही तासांत प्रचार थांबणार असून, ३ डिसेंबरला निकाल येणार आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपचा अंतर्गत सर्व्हे म्हणजेच जमिनीवरील कार्यकर्त्यांच्या अभिप्रायांवर आधारित प्राथमिक राजकीय अंदाज समोर आला असून त्यानुसार भाजप १७५ ठिकाणी नगराध्यक्षपद जिंकेल, असा दावा करण्यात आला आहे.

भाजपचा अंतर्गत सर्व्हे काय सांगतो?

सर्व्हेनुसार राज्यात नगराध्यक्ष पदासाठी भाजपची सर्वाधिक उमेदवारी असल्याने पक्षाला मोठा फायदा होईल.

२४२ ठिकाणी भाजपचे उमेदवार

४६ ठिकाणी महायुतीचे संयुक्त उमेदवार

एकूण मिळून बहुसंख्य जागांवर कमळ उमेदवार रिंगणात

यामुळे निवडणुकीनंतर महायुतीत भाजपच मोठा भाऊ ठरेल, असा विश्वास पक्षात व्यक्त केला जातो.

राज्यातील निवडणुकांचा माहोल पाहता भाजपला मैदानात उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असल्याचे नेते सांगत आहेत.

प्रचारातील आक्रमकता - फडणवीस, बावनकुळे, चव्हाण यांची धडाकेबाज दौरे

या निवडणुकीचा निकाल ठरवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री रविंद्र चव्हाण यांचे जिल्हानिहाय दौरे महत्त्वाचे ठरत आहेत.

-नागरिकांशी संवाद, विकास प्रकल्पांचे आश्वासन, निधीची तरतूद

-प्रत्येक नगरपालिकेत घाव घालणारा प्रचार

-स्थानिक पातळीवर उमेदवारांना मोठ्या प्रमाणात बॅकअप

भाजपच्या या कार्यक्रमांमुळे निवडणूक प्रचारात त्यांनी आघाडी घेतल्याचं चित्र अनेक ठिकाणी समोर आलं आहे.

महायुतीत मोठा भाऊ कोण?

या सर्व्हेनुसार-

-सर्वाधिक उमेदवारी

-सर्वाधिक संघटनात्मक तयारी

-आक्रमक प्रचार आणि नेतृत्वाचा प्रचंड सहभाग

या सर्व मुद्द्यांमुळे भाजपच महायुतीत निर्णायक भूमिका बजावेल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये दृढ झाला आहे.

चंद्रकांत पाटील यांचा दावा - आम्ही २०० जागांवर जिंकू

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी तर आणखी मोठा दावा करताना सांगितलं होतं की,

महाराष्ट्रातील २८० पैकी किमान २०० नगराध्यक्ष पदे भाजप जिंकेल.

त्यांच्या मते-

-ही गर्दी भाडोत्री नाही; नागरिक स्वयंस्फूर्तपणे जोडले जात आहेत

-देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील प्रचार मोहिमेला जोरदार प्रतिसाद

-बिहार आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीप्रमाणेच यश मिळण्याची शक्यता

अनेक ठिकाणी विकासकामे, निधी, नव्या प्रकल्पांची घोषणांची मालिका दिसत असल्याने स्थानिक स्तरावरही भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह शिगेला पोहोचला आहे.

नगरपालिका निवडणुकीत भाजप आक्रमक पद्धतीने उतरले असून त्यांच्या अंतर्गत सर्व्हे तील १७५ नगराध्यक्षांच्या भाकितामुळे पक्षाच्या आत्मविश्वासात भर पडली आहे. दुसरीकडे महायुतीतही या आकड्यांचा प्रभाव जाणवत असून मोठा भाऊ भाजपच ठरणार, अशीच चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे.तरीही, अंतिम सत्य ३ डिसेंबरला मतपेट्या उघडल्यावरच स्पष्ट होणार आहे.

संक्षिप्त

राजेश अग्रवाल यांनी मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारला

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई /प्रतिनिधी/ मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पदभार स्वीकारला. शासनाने राज्याच्या मुख्य सचिव पदावर श्री. अग्रवाल यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले होते.

मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.महाराष्ट्राचा विकास आणि गौरव वाढविण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत राहीन असे मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर श्री. अग्रवाल म्हणाले.

राजेश अग्रवाल यांचा अल्प परिचय

राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेतील महाराष्ट्र कॅडरचे १९८९ चे अधिकारी असून त्यांचे मूळ गाव पंजाबमधील जालंधर हे आहे. त्यांनी कॉम्प्युटर सिस्टिम विषयामध्ये बी.टेक केले आहे.

आपल्या सेवाकाळात त्यांनी सहायक जिल्हाधिकारी रत्नागिरी, जिल्हा परिषद जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे उप विशेष आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, भारत निवडणूक आयुक्त कार्यालयात संचालक, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इंटर्नल एक्स्चेंज ऑफ इंडिया नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मंत्रालय मुंबई येथे कृषी, मत्स्यव्यवसाय विभागात सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागात सचिव (अतिरिक्त कार्यभार), वित्त विभागात सचिव, सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), वित्त विभागात लेखा व कोषागारे विभागात सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार, वित्त विभागात सचिव (लेखा व कोषागारे)(व्यय - अतिरिक्त कार्यभार), केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या आदिवासी विकास विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाचे महासंचालक (प्रशिक्षण), पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस विभागात अतिरिक्त सचिव आणि वित्त सल्लागार, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागात सचिव, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागात सचिव, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव अशा विविध पदांवर काम केले आहे.

राज्यपालांच्या हस्ते अनुपम खेर यांना डीएव्ही रत्न पुरस्कार प्रदान

आत्ताच एक्सप्रेस

मुंबई /प्रतिनिधी/ शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूलचे माजी विद्यार्थी असलेले प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते डीएव्ही रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.राजभवन येथे राज्यपालांच्या हस्ते डीएव्ही व्यवस्थापन समितीतर्फे संस्थेच्या प्रथितयश माजी विद्यार्थ्यांचा सत्कार नुकताच करण्यात आला. राज्यपालांनी यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच विविध क्षेत्रांच्या माध्यमातून देशाला योगदान देत असल्याबद्दल त्यांना कौतुकाची थाप दिली.शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूल येथे आपण पहिली ते अकरावी इतकी वर्षे शिक्षण घेतले. या संस्थेने आपल्याला भारतीय मूल्ये तसेच देश भक्तीचे संस्कार दिले, असे सांगताना आपल्या जीवनात डीएव्ही पब्लिक स्कूलचे महत्व अनन्य साधारण असल्याचे अनुपम खेर यांनी सांगितले. त्या काळातले शिक्षक विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा द्यायचे, परंतु ते प्रेम व संस्कार देखील द्यायचे असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाला राज्यपालांच्या पत्नी दर्शना देवी, डीएव्ही कॉलेज व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पूनम सुरी, डीएव्हीच्या संचालिका डॉ. निशा पेशीन तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

नेपाळची नवी खोड

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी आसला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही खोड काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी खोड काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने गुरुवारी १०० रुपयांच्या नोटेचे अनावरण केले. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले आहे अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र या नोटाचे अनावरण करण्यात आले त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत - नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताची सातत्याने खोड काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही.

काय आहे सीमा वाद ?

१८१६ मधील अँग्लो - नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची खोड काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

एड्सविरुद्धची समाजक्रांती : आजारापेक्षा कलंक घातक

दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस 'जागतिक एड्स दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वैद्यकीयदृष्ट्या नसून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानवी मूल्यांच्या स्तरावर अत्यंत मोठे आहे. कारण एड्स हा आजार मानवी शरीरावर जितका परिणाम करतो त्याहून अधिक तो सामाजिक मनोवृत्ती, पूर्वग्रह, भीती, अज्ञान आणि विषमता यांच्याशी संबंधित आहे. एड्सविषयी बोलताना जगाला सर्वप्रथम जे शिकावे लागले ते म्हणजे हा आजार वैद्यकीय उपचारांनी काही प्रमाणात नियंत्रित होऊ शकतो, पण समाजातील भीती, तिरस्कार आणि भेदभावाविरुद्धची लढाई अधिक कठीण आहे. त्यामुळेच जागतिक एड्स दिवस हा केवळ स्मरणदिन नसून जाणीव, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे.

एचआयव्ही आणि एड्सचा इतिहास पाहिला तर १९८० च्या दशकात जेव्हा हा आजार जगासमोर आला, तेव्हा विज्ञानापेक्षा अफवा, संशय आणि अंधविश्वास अधिक वेगाने पसरले. हा आजार 'पाप', 'अनैतिकता', 'भ्रष्ट वर्तन' किंवा 'सामाजिक अधःपतन' यांचे प्रतीक मानला जाऊ लागला. त्यामुळे एचआयव्हीग्रस्त व्यक्तीला लागणारा धक्का हा आजारापेक्षा समाजाच्या प्रतिक्रिया, बहिष्कार आणि मानसिक तणावामुळे जास्त गंभीर होता.

समाजशास्त्र सांगते की कोणताही रोग हा केवळ शरीराशी संबंधित नसतो; तो समाजाच्या मूल्यव्यवस्था, नैतिकता, सत्ता, आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक मनोवृत्तीशी जोडलेला असतो. एड्स या आजाराने हे सत्य स्पष्ट केले.

आज जगात एचआयव्हीवर उपचार उपलब्ध आहेत. 'अँटी रेट्रो व्हायरल थेरपी'मुळे एचआयव्हीसह दीर्घायुषी, निरोगी आणि सन्मानाने जीवन जगणे शक्य झाले आहे. तरीही ग्रामीण भागात आजही अनेक मिथके जिवंत आहेत, एड्स स्पर्शाने पसरतो, भांडी शेअर केल्याने होतो, रक्तदानातून किंवा एकत्र बसल्याने लागतो अशी चुकीची धारणा अनेकांची आहे. या अज्ञानामुळे तपासणी न करण्याकडे झुकणारा मानसिकतेचा अडसर निर्माण होतो, आणि वेळेवर उपचार मिळत नाहीत.

समाजाने रोगापेक्षा त्या रोगाशी जोडलेल्या चुकीच्या समजुतींविरुद्ध लढा देणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर एड्स ही केवळ आरोग्य समस्या नाही, तर सामाजिक अन्याय, गरीबी, लैंगिक असमानता, दलित-वंचित गटांवरील भेदभाव, स्थलांतर, हिंसा, वेश्या व्यवसाय, औषधांचे व्यसन, लैंगिक शिक्षणाचा अभाव आणि लिंगविषयक पूर्वग्रह यांचे प्रतिबिंब आहे.

एचआयव्हीचा प्रसार जिथे जास्त आहे तेथील लोकसंख्या ही केवळ वैद्यकीय दृष्ट्या नाही तर सामाजिक दृष्ट्याही असुरक्षित आहे. स्थलांतरित कामगार, लैंगिक हिंसा सहन करणाऱ्या महिला, तृतीयपंथी समुदाय, वेश्या व्यवसायात असलेल्या महिला, इंजेक्शनच्या माध्यमातून ड्रग्ज घेणारे व्यक्ती, तरुण वयातील लैंगिक शिक्षणापासून वंचित विद्यार्थी आणि उपेक्षित समुदाय हे सर्व जास्त धोक्यात असतात. त्यांच्या जीवनातील असुरक्षितता आणि संसाधनांचा अभाव हा संसर्गाच्या जोखमीला वाढवतो.

विशेषतः महिलांच्या संदर्भात एड्सचा प्रश्न समाजातील पितृसत्ताक रचनेशी थेट जोडलेला आहे. अनेक महिलांना विवाहानंतरही सुरक्षित लैंगिकतेबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार नसतो. कौटुंबिक नातेसंबंधातील असमानता महिलांना एड्सच्या धोक्यापासून दूर रहाण्याचा अधिकार हिरावून घेते. समाजात अजूनही 'पुरुषांच्या लैंगिक वर्तनाबाबत सहनशीलता' आणि 'स्त्रियांनी शांतपणे स्वीकारण्याची अपेक्षा' ही मानसिकता अनेक ठिकाणी दिसते. त्यामुळे एड्सविरोधातील लढाई ही स्त्री-पुरुष समानतेची लढाईही आहे.

तृतीयपंथी समुदायाची स्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. सामाजिक बहिष्कार, रोजगाराचा अभाव, शिक्षणातील दुय्यमता आणि आरोग्य व्यवस्थेतील दुर्लक्षामुळे त्यांना उपचार, समुपदेशन आणि सन्मानाने सेवा मिळणे कठीण ठरते. समाजाने लैंगिकता आणि लैंगिक अभिव्यक्तीच्या विविधतेला स्वीकारल्याशिवाय एड्स नियंत्रणाचा उद्देश पूर्ण होणार नाही.

एचआयव्ही प्रतिबंधामध्ये जागरूकता, सुरक्षित लैंगिकतेचा प्रसार, रक्त आणि सुईंचे सुरक्षित नियमन, लैंगिक शिक्षण, समुपदेशन आणि तपासणी यांना फार महत्व आहे. परंतु त्याहून अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे समाजाची मानसिकता बदलणे.

एचआयव्हीग्रस्त व्यक्तींविषयीचा तिरस्कार संपला पाहिजे. त्यांच्याशी गुन्हेगारासारखे नव्हे तर सहानुभूती, सन्मान आणि समजुतीने वागण्याची गरज आहे. आजाराशी झुंज देणाऱ्या व्यक्तीला समर्थनाची आवश्यकता असते, न्यायाची नव्हे.

आज तंत्रज्ञानाद्वारे माहिती मिळवणे सोपे झाले आहे आणि युवा पिढी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारत आहे, ही बदलाची खूण आहे. शाळा-कॉलेज स्तरावर आरोग्य आणि लैंगिक शिक्षण अनिवार्य होणे गरजेचे आहे.

माध्यमांनी सनसनाटीपेक्षा जागरूकतेची भूमिका निभावली पाहिजे. डॉक्टर, समाजशास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्था, शासन आणि नागरिक यांनी एकत्रितपणे वैज्ञानिक माहिती, संवेदनशीलता आणि मानवाधिकार यांवर आधारित कार्ययोजना राबवणे आवश्यक आहे.

एड्सविरोधातील चालू मोहिमेत 'उपचार', 'प्रतिबंध' आणि 'जागरूकता' यांच्याबरोबरच 'मानवता' आणि 'समानतेचा अधिकार' हे दोन मुद्दे केंद्रस्थानी असायला हवेत. कारण एड्सविषयीचा सर्वात मोठा धोका हा रोग नाही, तर त्याच्याशी जोडलेला कलंक, भीती आणि सामाजिक न्यायाचा अभाव आहे. समाज बदलला, विचार बदलले, आणि प्रत्येक व्यक्तीला न्याय्य सन्मान मिळाला तर एड्स हा आजार नियंत्रणात आणणे आणि भविष्यात त्याचे उच्चाटन करणे शक्य होईल.

म्हणूनच जागतिक एड्स दिन आपल्याला आठवण करून देतो की, एचआयव्हीग्रस्त व्यक्ती 'इतर' कोणी नाही तर तो आपल्याच समाजाचा, आपल्या मानवतेचा भाग आहे. आजारी शरीराला औषध मिळते, पण जखमी मनाला स्वीकार, आधार आणि सन्मान लागतो. आणि जेव्हा समाज उपचाराइतकाच सन्मान देईल, तेव्हा एड्सविरोधातील खरी लढाई जिंकली जाईल.

-डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

अभ्यागतांसाठी सूचना व भित्तिपत्रकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

आत्ताच एक्सप्रेस
मुंबई/प्रतिनिधी/भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी मुंबई येथे अभिवादनासाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी तयार करण्यात आलेल्या सुचना पुस्तिकेचे व भित्तीपत्रकाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते रविवारी (दि. ३०) राजभवन, मुंबई येथे करण्यात आले.

यावेळी बोलताना राज्यपालांनी डॉ आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. ज्येष्ठ आर्य समाजी नेते आत्माराम अमृतसरी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्यास मदत व शिफारस केली असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत समरसता व बंधुभाव या मूल्यांच्या प्रचार प्रसारासाठी आपण विविध तालुक्यांना भेट देण्याचा उपक्रम हाती घेतला असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले. आजपर्यंत आपण गुजरात येथील ११ गावांना भेट दिली असून त्याठिकाणी ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, ग्रामसभा, दलित - आदिवासी कुटुंबाच्या घरी भोजन, शाळेत मुक्काम व दुसऱ्या दिवशी शिवारावर जाऊन लोकांना नैसर्गिक शेतीचे महत्व पटवणे हा उपक्रम सुरु केला असल्याचे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्रात देखील हा उपक्रम सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे तसेच समितीचे इतर सदस्य यावेळी उपस्थित होते.

भारतीय लोकशाहीचे आत्मभान आणि भविष्याचा मार्गदर्शक

भारताचा इतिहास हा केवळ साम्राज्यांच्या उदय-पतनाचा किंवा युद्धांच्या नोंदींचा इतिहास नाही, तर मानवी मूल्यांचा, स्वातंत्र्याचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि न्याय्य समाजाच्या शोधाचा इतिहास आहे. या इतिहासात सर्वात मोठा आणि शाश्वत टप्पा म्हणजे भारतीय संविधानाची निर्मिती आणि त्यानिमित्त घडलेले बौद्धिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिवर्तन. म्हणूनच २६ नोव्हेंबर हा दिवस केवळ एक औपचारिक स्मरणदिन नाही, तर भारतीय प्रजासत्ताकाच्या अस्तित्वाचा आत्मा, तत्त्वज्ञान आणि लोकशाहीच्या भविष्याचा दीपस्तंभ आहे. संविधान म्हणजे फक्त कायद्यांचा संग्रह नाही, तर राष्ट्राच्या मूल्यांचे, संघर्षांचे आणि आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. यामुळेच संविधान हा दस्तऐवज नसून तो विचारप्रवाह आहे. शासनव्यवस्थेला दिशा देणारा, समाजाला मूल्याधिष्ठित करणारा आणि व्यक्तीला अधिकार व जबाबदारी यांच्यातील संतुलन समजावून देणारा एक जिवंत करार आहे. म्हणूनच संविधान दिन हा स्मरणाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण नागरिक म्हणून संविधानाच्या आत्म्याशी किती प्रामाणिक आहोत? आपण त्या मूल्यांना जपतो आहोत की विसरतो आहोत? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संविधानिक लोकशाही ही केवळ शासनप्रणाली आहे की ती आपल्या जीवनपद्धतीचा, संस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहे? हे बघणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानाची निर्मिती ही केवळ कायदेविषयक प्रक्रिया नव्हती, तर ती विवेक, अध्ययन, संशोधन, संवाद, मतभेद आणि सामूहिक संमती यांच्या अनोख्या प्रवासातून साकारली गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २८४ सदस्यीय घटनासभा जवळपास २ वर्षे ११ महिने १८ दिवस या कार्यात संलग्न होती. परंतु केवळ कालावधी महत्त्वाचा नाही, तर त्या प्रक्रियेचा बौद्धिक दर्जा, तर्कसंगतता आणि भविष्यदर्शी दृष्टिकोन व्यक्तिला चकित करणारा आहे. जगभरातील ६० हून अधिक देशांचे संविधान, ब्रिटिश संसदीय परंपरा, अमेरिकेचे मूलभूत अधिकार, फ्रेंच क्रांतीची स्वातंत्र्य-समानता-बंधुता तत्त्वे आणि बौद्ध चिंतनातील समाजकल्याण हे सर्व भारतीय समाजशास्त्रीय संदर्भात नव्याने व्याख्यायित झाले. संविधान केवळ शासनाचा पाया नाही, तर भारतीय समाजरचनेतील ऐतिहासिक विषमता, जात, वर्ग, धर्म, लिंग विषमता आणि सामाजिक अन्याय यांना आव्हान देणारी परिवर्तनसूचक क्रांती आहे. म्हणूनच संविधान हा कायदा नसून समतावादी सामाजिक क्रांतीचा मार्गदर्शक आहे.

संविधानाच्या प्रस्ताविकेत व्यक्त झालेली स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये ही केवळ शब्द नाहीत, तर नागरिकांनी जगावे असे जीवनसूत्र आहेत. प्रस्तावना म्हणजे संविधानाचे हृदय, ज्यातून राष्ट्राची आत्मा ओतप्रोत भरलेली आहे. सामाजिक न्याय म्हणजे केवळ कायद्याने समानता नव्हे, तर व्यक्तीला समान संधी मिळावी ही जबाबदारी आहे. आर्थिक न्याय म्हणजे विकासाची फळे सर्वांपर्यंत पोहोचविण्याची यंत्रणा, तर राजकीय न्याय म्हणजे प्रत्येक नागरिकाला शासन प्रक्रियेत सहभाग देणे. आपल्या संविधानाने याच दृष्टीने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार दिला आहे. तोही जात, धर्म, लिंग किंवा संपत्ती यांवर आधारित भेदभाव न करता. ही भारताच्या प्रगल्भ सामाजिक मनोवृत्तीची आणि समावेशकतेची साक्ष देणारी घटना होती. भारतीय संविधानाची समाजशास्त्रीय ताकद म्हणजे त्याचे धर्मनिरपेक्ष तत्त्व होय. धर्मनिरपेक्षता याचा अर्थ धर्मविरोध नव्हे, तर सर्व धर्मांना समान सन्मान व स्वातंत्र्य देणे. आपल्या समाजात धर्माचा प्रभाव केवळ श्रद्धेपरता मर्यादित नसून सामाजिक ओळख, वर्तन, नातेसंबंध आणि संस्कार यांवर तो खोलवर परिणाम करतो. अशा बहुविध धार्मिक संरचनेच्या राष्ट्रात संविधानाने धर्म आणि शासन यात योग्य अंतर ठेवले, राज्य नागरिकांशी धर्माधारित भेदभाव करणार नाही. म्हणूनच धर्मनिरपेक्षता ही संकल्पना ऐतिहासिक दृष्टीने लोकशाही टिकवण्यासाठी आवश्यक आहे. तिचा उपयोग फाटे पाडण्यासाठी नव्हे, तर एकत्र आणण्यासाठी होणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार हे नागरिकांच्या स्वातंत्र्याचे किल्ले आहेत. अभिव्यक्तिस्वातंत्र्य, समानतेचा अधिकार, जीवन व स्वातंत्र्याचा अधिकार, शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार, शोषणविरोधी अधिकार हे सर्व व्यक्तीच्या सन्मानाचे आधारस्तंभ आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या अधिकारांनी समाजातील वंचित, दुर्बल, स्त्री, आदिवासी, दलित आणि अल्पसंख्याक समुदायांना सामर्थ्य दिले. हे अधिकार लोकशाहीचा पाया आहेत, परंतु त्याचवेळी संविधानाने मूलभूत कर्तव्यांची कल्पना मांडून संतुलन निर्माण केले.

केवळ अधिकार मागणे नव्हे, तर समाज व राष्ट्राबद्दल कर्तव्य पार पाडणे हे नागरिकतेचे परिपक्व रूप आहे. परंतु संविधान ही स्थिर संकल्पना नाही. ती परिस्थितीनुसार विकसित होणारी, बदल स्वीकारणारी सजीव प्रक्रिया आहे. म्हणूनच दुरुस्त्या या संविधानाचे सामर्थ्य आहेत. न्यायालयीन व्याख्या, लोकसंख्येतील बदल, तंत्रज्ञानातील प्रगती, आर्थिक स्वरूपातील परिवर्तन या सर्व घटकांमुळे संविधानाने स्वतःला वेळोवेळी सुधारत ठेवले आहे. बदलता समाज - जिवंत संविधान ही संकल्पना भारताच्या भविष्याचे मार्गदर्शन करते.

संविधान दिन हा इतिहासाचे उदात्तीकरण करण्याचा दिवस नाही, तर वर्तमानाला प्रश्न विचारण्याचा दिवस आहे. आपण संविधानातील मूल्यांना मान देतो आहोत की त्यांच्या विरोधी वागतो आहोत? समाज माध्यमे, राजकीय वाद, ध्रुवीकरण, अंधश्रद्धा, जातीय-धर्मीय दुभंग, स्त्रीविरोध, पर्यावरणीय संकट, डिजिटल असमानता, बेरोजगारी, गरीबी या सर्व प्रश्नांची उत्तरे संविधानाने दिली आहेत, परंतु आपण त्या उत्तरांना कृतीत अंमलात आणतो आहोत का? संविधानाने नागरिकांना मोकळे विचार करायला शिकवले, पण आज विचार व्यक्त करणे आणि असहमती नोंदविणे ही एक आव्हानात्मक प्रक्रिया ठरत आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ आहे तर्कशुद्धतेने प्रश्न विचारणे, परंतु आज मतप्रदर्शन हे भावना, असहिष्णुता आणि ध्रुवीकरणाच्या भोवऱ्यात अडकलेले दिसते. अशा वेळी संविधान केवळ पानांवर नाही, तर विचारांमध्ये जिवंत राहिले पाहिजे. आजची युवा पिढी मोठ्या शक्यता, वेग, तंत्रज्ञान आणि जागतिक दृष्टिकोनासह वाढते आहे. परंतु त्याचवेळी माहितीचा प्रचंड मारा, मूल्यसंघर्ष, ओळखांचे राजकारण, रोजगाराची असुरक्षा आणि दिशाहीनता यामुळे तिच्यासाठी संविधानाचे मार्गदर्शन आणखी महत्त्वाचे ठरते. कारण संविधानानेच तिला समानता, संधी, सन्मान, अभिव्यक्ती आणि प्रगतीची हमी दिली आहे. त्यामुळे संविधान दिन हा केवळ अभ्यासक्रमातील घटक नसून पुढील पिढीच्या भविष्याचे अधिष्ठान ठरायला हवा.

भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची बांधिलकी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, इतर मागासवर्ग, स्त्रिया, अपंग, धार्मिक-अल्पसंख्याक आणि वंचित घटकांसाठी दिलेल्या विशेष तरतुदी ही केवळ कलमे नाहीत तर त्या भारतातील ऐतिहासिक विषमता आणि सामाजिक जखमांचे उपचार आहेत. समता म्हणजे सर्वांना सारखे वागवणे नव्हे, तर मागे राहिलेल्यांना पुढे आणण्याची जबाबदारी स्वीकारणे.

म्हणूनच सामाजिक न्याय हा संविधानाचा भावनिक केंद्रबिंदू आहे, जो एका समतामूलक समाजाच्या दिशेने वाटचाल करतो. संविधान दिनाचा खरा अर्थ समजून घेताना हे महत्त्वाचे ठरते की संविधान नागरिकांना फक्त हक्क देत नाही, तर जबाबदार नागरिकत्व शिकवते. संविधानाने विचारमुक्तता दिली आहे, परंतु त्याचवेळी संवाद, तर्क, वैज्ञानिक दृष्टिकोन, शांत सहअस्तित्व आणि सांस्कृतिक विविधतेचा सन्मान करण्याचा मार्ग दाखवला आहे. संविधान मूल्यांचे संरक्षण करते, पण एका मूल्याच्या नावाखाली दुसऱ्या मूल्याचे दमन करण्याचा अधिकार कोणालाही देत नाही. म्हणूनच संविधानाचा आत्मा जपणे ही प्रत्येक नागरिकाची आणि संस्थेची जबाबदारी आहे. आजच्या सामाजिक वास्तवात संविधानावरील विश्वास हे लोकशाहीचे ऑक्सिजन आहे. विश्वास नष्ट झाला तर लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येते. म्हणून संविधान दिन अनुभवताना हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की संविधान फक्त न्यायालयांचे पुस्तक नाही, तर आपल्या नागरिकतेचे तत्त्वज्ञान आहे. राष्ट्राच्या वाढीचा मार्ग संविधानाच्या चौकटीतून जातो, आणि टिकाऊ विकास, सामाजिक सलोखा, लोकशाही मूल्यांचा सन्मान आणि सहजीवन यांना संविधानाचे मार्गदर्शन अनिवार्य आहे.

शेवटी, संविधानाने भारताला केवळ शासनव्यवस्था दिली नाही, तर स्वाभिमान, नागरिकत्व, अधिकार, समानता, न्याय आणि मानवी मूल्यांची दिशा दिली. त्यामुळे संविधान दिन हा साजरा करण्याचा दिवस आहे, पण तो साजरा करण्याची पद्धत केवळ कार्यक्रम, भाषणे किंवा औपचारिकता नसावी; तर आत्मपरीक्षण, अध्ययन, संवाद, तर्क, संवेदनशीलता आणि जबाबदार आचरणातून संविधान जिवंत ठेवण्याची प्रतिबद्धता असावी. कारण संविधान जिवंत आहे ते आपल्या विचारांमध्ये, वागणुकीत, संघर्षात, सामाजिक चळवळींमध्ये, न्यायालयात, संसदेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एका जागरूक, संवेदनशील नागरिकाच्या मनात. संविधान म्हणजे देशाचा आत्मा आणि तो आत्मा जिवंत राहिला पाहिजे, कारण संविधान वाचल्याने नाही, तर जगल्याने लोकशाही मजबूत होते.

-डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

फुलंब्री नगरपंचायतीची निवडणूक पुन्हा लांबली

आत्ताच एक्सप्रेस

फुलंब्री /प्रतिनिधी/ फुलंब्री नगरपंचायतीच्या निवडणुकीसंदर्भात मोठा बदल घडला असून, २ डिसेंबर रोजी होणारी निवडणूक आता पुढे ढकलण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नवीन मतदानाची तारीख २० डिसेंबर २०२५ (शनिवार) अशी निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शहरात दिवसभर आणि अर्ध्या रात्रीपर्यंत चर्चा, संभ्रम आणि उत्सुकता निर्माण झाली होती. नागरिकांना खरोखरच निवडणूक होणार की नाही, हा प्रश्न पडला होता.

न्यायालयीन प्रकरणामुळे निर्णय

३० नोव्हेंबरला दिवसभर या विषयावर वारंवार चर्चा होत होती. याबाबत माहिती घेताना दैनिक 'आत्ताच एक्स्प्रेस'चे प्रतिनिधी सरफराज पटेल यांच्याशी बोलताना नगरपंचायतीचे मुख्याधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले की:सध्या न्यायालयात संबंधित प्रकरण प्रलंबित आहे. निकाल लागण्यास वेळ लागणार असल्याने निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे प्रशासनाने सावधगिरीचा उपाय म्हणून निवडणुकीची तारीख बदलली असून, न्यायालयीन निकाल स्पष्ट होईपर्यंत पुढील प्रक्रियेला विलंब होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

उमेदवारांबाबत महत्त्वाचा निर्णय

- आधीच जाहीर झालेल्या कार्यक्रमानुसार अधिकृत उमेदवार तेच राहणार आहेत.

- तथापि, उमेदवारांना अर्ज माघारी घेण्याची परवानगी असेल.

- निवडणूक प्राधिकरणाने याबाबत स्पष्टता देत सांगितले की, कोणताही उमेदवार इच्छुक असल्यास तो वेळेत अर्ज माघारी घेऊ शकतो.

नागरिकांमध्ये उत्सुकता आणि चर्चेला उधाण

या अचानक बदलामुळे फुलंब्री शहरामध्ये राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे.

उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी नव्या तारखेनुसार रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

नागरिकांमध्येही मतदानाच्या तारखेतील या बदलाबद्दल उत्सुकता असून, काही जणांनी हा निर्णय योग्य असल्याचे मत व्यक्त केले आहे, कारण न्यायालयीन निकालाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक पुढे ढकलण्याशिवाय पर्याय नव्हता.एकूणच, फुलंब्री नगरपंचायतीची निवडणूक आता नव्या तारखेप्रमाणे होणार असून प्रशासन, उमेदवार आणि नागरिक आगामी कार्यक्रमाची प्रतीक्षा करत आहेत.

सुधारित निवडणूक कार्यक्रम

नवीन तारखांनुसार संपूर्ण निवडणूक वेळापत्रक पुढीलप्रमाणे असेल:

-४ डिसेंबर २०२५ : निवडणूक प्रक्रिया पुन्हा सुरू

-१० डिसेंबर २०२५: अर्ज माघारीची अंतिम तारीख

-११ डिसेंबर २०२५: अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध

-२० डिसेंबर २०२५: मतदानाचा दिवस

डिसेंबर २०२५ : मतमोजणी आणि निकाल जाहीर

दैनिक
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
दिनांक-०१/१२/२०२५

CHANGE OF NAME
I AM CHANGING MY NAME FROM
OLD NAME
SIDDHANT KANCHAN CHATE
TO,
NEW NAME
SIDDHANT KANCHANKUMAR CHATE
AS PER MY DOCUMENTS
ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003

दैनिक
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
दिनांक-०१/१२/२०२५

CHANGE OF NAME
I, SIDDHANT KANCHANKUMAR CHATE IS CHANGING MY FATHERS NAME FROM
OLD NAME
KANCHAN DASHRATHRAO CHATE
TO,
NEW NAME
KANCHANKUMAR DASHRATHRAO CHATE
AS PER MY DOCUMENTS
ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003

दैनिक
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
दिनांक-०१/१२/२०२५

CHANGE OF NAME
I, SIDDHANT KANCHANKUMAR CHATE IS CHANGING MY MOTHERS NAME FROM
OLD NAME
SHIVKANYA KANCHAN CHATE
TO,
NEW NAME
SHIVKANYA KANCHANKUMAR CHATE
AS PER MY DOCUMENTS
ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003

फुलंब्रीत संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकास अभिवादन

आत्ताच एक्सप्रेस

फुलंब्री /प्रतिनिधी/ फुलंब्री शहरात संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात सर्व समाज बांधवांनी सामूहिक बौद्ध वंदना घेत वातावरण अधिक मंगलमय केले.

भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष संजय हिवराळे यांनी भारतीय संविधानाची उद्देशिका वाचून नागरिकांना अधिकार आणि कर्तव्य यांचा समतोल साधण्याचे, तसेच समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यावर आधारित मूल्यांनुसार वागण्याचे आवाहन केले. त्यांनी संविधान दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून लोकशाहीची जाणीव दृढ करण्याचा दिवस असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात माजी प.स. सभापती जे.पी. शेजवळ, पोलिस निरीक्षक संजय सहाणे, संजय मोरे, डॉ. के.बी. हिवराळे, बौद्ध महासभेचे सचिव विजय गंगावणे,तेजराव जाधव,कैलास भोसल, इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.हा कार्यक्रम फुलंब्री तालुका बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता आणि नागरिकांनी संविधानाचे संरक्षण, पालन आणि प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

कट-कट गेटचे अपूर्ण काम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी - राष्ट्रवादी युवक काँग्रेस

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक शहर उपाध्यक्ष अशफाक जमील खान यांनी कट-कट गेट परिसरातील अपूर्ण रिपेअरींगचे काम त्वरित पूर्ण करण्याची मागणी



केली आहे. त्यांनी महानगरपालिकेला निवेदनाद्वारे तसे सांगितले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, शहरातील ५२ दरवाजांचे रिपेअरींगचे काम सुरू असून, कट-कट गेटचे काम मध्येच थांबविण्यात आले आहे. गेटमध्ये सुशोभीकरण, जाळी बसविणे, झाडे लावणे यासह अनेक कामे प्रलंबित आहेत. देखरेख नसल्यामुळे परिसरात घाण साचली असून जंगली झाडेही मोठ्या प्रमाणात वाढली आहेत.

अशफाक जमील खान यांनी अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्यास तसेच परिसराची साफसफाई करण्यास संबंधित विभागाला आदेश देण्याची मागणी केली आहे. तसेच, ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी या कार्यवाहीला प्राधान्य देण्याचीही त्यांनी विनंती केली आहे.

लोका लोकांत द्वेष फैलवुन मत मागु नका, तर प्रेमाने मतदान मागा-खासदार इम्रान प्रतापगडी,

आत्ताच एक्सप्रेस

खुलताबाद /प्रतिनिधी/ खासदार इम्रान प्रतापगडी यांनी रविवारी (दि. ३०) खुलताबाद शहरात काँग्रेसच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार अमीर पटेल यांच्या प्रचार सभेत भाषण देताना मतदारांना एक वेगळा संदेश दिला. त्यांनी म्हटले की, लोका-लोकांत द्वेष फेलवून मत मागू नका, तर प्रेमाने मतदान मागा. खासदार प्रतापगडी यांनी आपले भाषण शायराना अंदाजात आणि भावनिकतेने मांडले, ज्यामुळे नागरिकांमध्ये उत्सुकता आणि एक प्रकारचा ऊर्जा निर्माण झाली.

त्यांनी विशेष करून सांगितले की, भारतीय जनता पक्षाची वेळ जेव्हा बिकट असते, तेव्हा ते वेळ दर्शवणाऱ्या घड्याळाचा आधार घेतात.

परंतु आता हेच घड्याळ भाजपची वेळ ठरविणार आहे, असे प्रतिपादन करून त्यांनी भाजपविरोधातील जनता एकत्र होण्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी उदाहरण देत सांगितले की, देशात भाईचारा आहे, आणि लोकसभेत तसेच राज्यसभेत मुस्लिम खासदारांची संख्या बोटावर मोजता येईल, तरीही विविध समाजातील खासदारांनी एकत्र येऊन वक्फ बिलच्या मुद्यावर एकमेकांचे सहकार्य केले.

खासदार प्रतापगडी यांनी आणखी नमूद केले की, जर कोणीतरी वाईट वागणूक दाखवली तर त्याचे उत्तर प्रेमळ वागणुकीतून द्यावे, आणि या संदर्भात आफ्रिकेचे दिवंगत राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांचे उदाहरण दिले. यामुळे त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले.

त्यांनी आपल्या भाषणात काँग्रेसच्या युवा नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, 'भारत जोडो' यात्रेचे उदाहरण दिले. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत या पदयात्रेत सहभागी होऊन देशातील राष्ट्रीय एकात्मतेसाठी काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच महात्मा गांधी यांनी इंग्रज हटावो या उद्देशाने नेतृत्व केले, तसेच आता नवे इंग्रज हटवून नवे गांधी नेतृत्व उदयास येणार असल्याचेही स्पष्ट केले. अच्छे दिन वाल्यांना लवकरच बुरे दिन येणार आहेत, असे प्रतापगडी यांनी नागरिकांना जागरूक करत सांगितले.

सभेला उपस्थित असलेल्या मान्यवरांमध्ये खासदार डॉ. कल्याण काळे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पा. डोंणगांवकर, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आमिर पटेल, तालुकाध्यक्ष अनिल नलावडे, शहराध्यक्ष अब्दुल मजीद मनियार, अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष मसियोद्दीन सौदागर, औरंगाबाद शहर अध्यक्ष शेख युसुफ, शहराध्यक्ष इब्राहिम पठाण, नासिर मौलाना, माजी तालुकाध्यक्ष अनिल श्रीखंडे, मझहर अली उर्फ राजू सेट, शेख सरफराज, अब्दुल समद टेलर, अमर चाऊस यांचे समावेश होता. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाचे उमेदवारही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील नागरिकांनी खासदार प्रतापगडींचे शायराना अंदाजातले भाषण ऐकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली. त्यांच्या प्रेमपूर्ण मतप्रचाराच्या संदेशाने आणि समाजिक ऐक्याच्या भावनेने सभा रंगली. यामुळे खुलताबादमध्ये आगामी नगरपरिषदेच्या निवडणुकीत मतदारांमध्ये काँग्रेसच्या उमेदवारांबद्दल सकारात्मक भावना निर्माण होण्याची शक्यता आहे.

पी.एम श्री केंद्रीय विद्यालय,नांदेड येथे 'आजी-आजोबा दिन' मोठ्या उत्साहात साजरा!

आत्ताच एक्सप्रेस

नांदेड/ उध्दव सरोदे /येथील पी.एम श्री.केंद्रीय विद्यालय, दक्षिण मध्य रेल्वे,नांदेड येथील प्राथमिक विभागात 'आजी-आजोबा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या जीवनात आजी-आजोबांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती.प्रिया भगत आणि मुख्याध्यापक श्री.राम श्रृंगारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले.तर शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांकडून लेझीम नृत्य आणि कुंकुम टिळा लावून आजी-आजोबांचे भव्य स्वागत करण्यात आले.यामध्ये प्रत्येक आजी-आजोबांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.या

कार्यक्रमाची सुरूवात स्वागत नृत्याने होवून त्यानंतर विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांवर आधारित गाणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमात आजी-आजोबांसाठी मनोरंजक खेळांचे आयोजन

करण्यात आले होते.या खेळांच्या विजेत्यांना शाळेतर्फे पुरस्कार (प्रोझेस) देऊन गौरविण्यात आले.यावेळी सौ.जयशिला उद्धवराव सरोदे यांचा आजी-आजोबांचे प्रतिनिधी म्हणून शाळेतर्फे मंचावर स्वागत करण्यात आले. पत्रकार श्री. उद्धवराव सरोदे आणि श्री.ए.जी. जोंधळे या आजी-आजोबांनी मंचावरून आपले मनोगत व्यक्त करून शाळेचे आभार मानले.अनेक आजी-आजोबांनी मंचावर नृत्य आणि गाणी सादर करून कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मास्टर क्षितिज,स्वारित आणि नंदिनी यांनी यशस्वीरित्या पार पाडले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकांनी सक्रिय सहकार्य करून हा संपूर्ण कार्यक्रम,सहअभ्यासक्रम,उपक्रम प्रभारी श्री.रवी खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.श्री.रवी खराटे यांनी सर्व आजी-आजोबांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवल्याबद्दल त्यांचे आभार मानले व हा कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला.

भारतीय संविधान हा भारत देशाचा आत्मा-गुणवंत एच.मिसलवाड

आत्ताच एक्सप्रेस

नांदेड/ प्रतिनिधी /जगातील २४३ देशाच्या पाठीवर भारतीय लोकशाही ही सर्वश्रेष्ठ लोकशाही असून भारतातील तळागळातील शेवटच्या माणसासाठी विकासात्मदृष्ट्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य व देशाची अखंडता अबाधित ठेवून समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय ही मुल्ये राज्यघटनेने प्रदान केलेली असून भारतीय संविधान हा भारत देशाचा आत्मा होय, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिकक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.२६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ७६ वा भारतीय संविधान दिन (अमृत महोत्सवी वर्ष) म्हणून मोठ्या

उत्साहात साजरा करण्यात आला. या संविधान दिन कार्यक्रम सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

सर्वप्रथम विभागीय वाहतुक अधिक्षक तथा प्रभारी आगार व्यवस्थापक मा.श्री. मिलींदकुमार सोनाळे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पुढे बोलताना आपल्या भाषणात ते म्हणाले की, भारतरत्न प.पुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २२ अंतरराष्ट्रीय देशांच्या कायद्यांचा अभ्यास करून आपल्या जीवनात ४० हजार पुस्तकांचे (ग्रंथाचे) वाचन करून दोन वर्षे अकरा महिने १८ दिवस अहोरात्र मेहनत घेवून आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर राज्यघटनेत ३९५ कलमे १२ परिशिष्ट सामावुन महान असा भारतीय संविधान ग्रंथ या भारत देशाला सुपूर्द केला म्हणून आज प्रत्येक भारतीय नागरिकांनी संविधान रक्षणाप्रती सजग राहुन संविधानाचे वाचन करणे ही काळाची गरज आहे, असे ही ते शेवटी आपल्या भाषणात बोलताना म्हणाले. यावेळी मा.श्री.मिलिंद कुमार सोनाळे यांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करून सर्व कष्टकरी कामगार कर्मचाऱ्यांना उद्देशिकेची सामुहिकरित्या शपथ दिली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक विष्णु हरकळ, आगार व्यवस्थापक मिलींदकुमार सोनाळे, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, लेखाकार सतिश गुंजकर, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, पाळी प्रमुख मनोहर माळगे, विनायक चव्हाण, वरिश्ठ लिपीक नितीन मांजरमकर, सुनिल मोरे, सौ.श्वेता तेलेवार, वैशाली कोकणे, शिल्पा ढवळे, मीना कदम, कृष्णा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी रामप आगारातील कष्टकरी-कामगार कर्मचारी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संक्षिप्त

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध

आत्ताच एक्सप्रेस

जालना/ प्रतिनिधी/ जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे. आगामी शैक्षणिक सत्राकरीता सहावीच्या प्रवेशासाठी होणाऱ्या निवड चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र जारी करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी अधिकृत वेबसाइटवर जाऊन आपला नोंदणी क्रमांक आणि जन्मतारीख वापरून लॉग-इन करावे आणि प्रवेशपत्राची प्रिंट काढून घ्यावी. परीक्षा केंद्रावरील प्रवेशासाठी हे प्रवेशपत्र सोबत असणे अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज केले आहेत, ते आता https://cbseitms.rcil.gov.in/nvs अधिकृत संकेतस्थळावरून आपले प्रवेशपत्र डाउनलोड करू शकतात. तरी परीक्षेसाठी अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शिक्षक व मुख्याध्यापकांनी याची नोंद घ्यावी. तसेच संकेतस्थळावरुन आपले प्रवेशपत्र डाऊनलोड करावेत. तरी उमेदवारांनी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या दिवशी कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी प्रवेशपत्रावर दिलेल्या परीक्षा केंद्राचे ठिकाण, वेळेची माहिती आणि सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करावे, असे आवाहन अंबा-परतूर जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.जी. पवार यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे जिल्हास्तरीय फूटसाल स्पर्धा उत्साहात संपन्न झाली

आत्ताच एक्सप्रेस

जालना/ प्रतिनिधी/ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद जालना आणि जालना जिल्हा फूटसाल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज, ३० नोव्हेंबर २०२५ रोजी, जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे जिल्हास्तरीय फूटसाल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले आणि स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.स्पर्धेचे आयोजन विद्यार्थ्यांमध्ये फूटसालसारख्या वेगवान आणि कौशल्यपूर्ण खेळाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी करण्यात आले होते. या स्पर्धेत ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूलचे संघ (मुले - १७, मुली - १९) आणि हुद्दा उर्दू स्कूलचे संघ (मुले - १९) या संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. संघांनी संघभावना, क्रीडा कौशल्य आणि संघटनात्मक ताकद दाखवून सर्वांच्या मनात ठसा उमठवला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मनोज इंगळे, सचिन बागल, किशोर जाधव, शेख जमीर, तसेच जालना जिल्हा फूटसाल असोसिएशनचे शेख इस्माईल, शेख रियाज आणि सय्यद सुलतान उपस्थित होते. त्यांनी विजेत्या खेळाडूंसह सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि फूटसालसारख्या वेगवान खेळाला जिल्ह्यात अधिक प्रोत्साहन मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, मेहनत आणि टीमवर्कचे महत्त्व समजावले.

स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी श्री संजय गाढवे, क्रीडा अधिकारी सौ. लता लोंढे, सौ. आरती चिल्हारे, तसेच क्रीडा मार्गदर्शक श्री आशिष जोगदंड, श्री सिद्धार्थ कदम आणि गणेश गायके यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली. स्पर्धेच्या आयोजनात त्यांनी सुरळीत मार्गदर्शन केले आणि प्रत्येक खेळाडूला योग्य वेळी प्रोत्साहन दिले.स्पर्धेत सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि क्रीडा साहित्याचे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामुळे फक्त विजेत्यांना नाही तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांनाही पुढील स्पर्धांमध्ये भाग घेण्याची प्रेरणा मिळाली. आयोजकांनी सांगितले की, भविष्यातही असेच क्रीडा कार्यक्रम नियमितपणे घेऊन जिल्ह्यातील तरुणांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहित करण्याचा उद्देश आहे.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक क्षमतेसह मानसिक तयारी, निर्णयक्षमता आणि संघभावना वाढीस लागली, तसेच जिल्ह्यातील फूटसाल खेळाचा दर्जा उंचावण्यास मोठा हातभार लागला.

वडिलांना वाऱ्यावर सोडणाऱ्या मुलाला उच्च न्यायालयाचा दणका; फसवून घेतलेले घर परत मिळवून दिले!

आत्ताच एक्सप्रेस

जालना/ प्रतिनिधी/ मुंबई उच्च न्यायालयाने एका मुलाला वडिलांकडून मिळालेली घराची संपत्ती परत देण्यास नकार दिला नाही तर त्याला स्पष्टपणे धडा शिकवला आहे. ही घटना केवळ एका कुटुंबाची गोष्ट नसून, संपूर्ण समाजासाठी आई-वडिलांच्या सन्मानाची आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांची महत्त्वाची शिकवण आहे.

या प्रकरणात, ८६ वर्षीय श्री. राम स्वरूप सोधानी यांनी आपला फ्लॅट मुलगा रविप्रकाश सोधानी आणि नातवाच्या नावावर गिफ्ट डीडद्वारे हस्तांतरित केला. मात्र, वडिलांच्या आरोग्यदुष्काळाचा आणि दुर्बल अवस्थेचा फायदा घेत मुलाने आणि त्याच्या पत्नीने वडिलांचा छळ सुरु केला. त्यांना त्यांच्या स्वतःच्या घरात एका खोलीत बंदिस्त केले, बँक खात्यातून पैसे काढले आणि मूलभूत गरजा न पुरवल्यामुळे वडील मानसिक आणि शारीरिक त्रासात आले. अशा परिस्थितीत वडीलांनी 'मेंटेनन्स ट्रिब्युनल'कडे तक्रार केली आणि ट्रिब्युनलने गिफ्ट डीड रद्द करण्याचा निर्णय दिला.

या प्रकरणात महत्त्वाची गोष्ट म्हणजे न्यायालयाने स्पष्ट केले की मालमत्ता हस्तांतरित करताना 'काळजी घेतली जाईल' अशी अट लेखी स्वरूपात नसली तरी, ती मुलांच्या जबाबदारीत समाविष्ट असते. जर मुलांनी वडिलांची काळजी न घेतल्यास, संपत्ती हस्तांतरित करणे फसवणूक किंवा अनुचित प्रभावाखाली झालेले मानले जाऊ शकते. उच्च न्यायालयाने या तत्त्वाचा आधार घेत मुलाच्या नावे केलेला गिफ्ट डीड रद्द केला आणि वडिलांना त्यांच्या घराचा ताबा परत दिला.

हा निकाल भारतीय संस्कृतीतील कुटुंब मूल्ये, आई-वडिलांचा सन्मान, आणि ज्येष्ठ नागरिकांच्या अधिकार यांचा पुरावा आहे. रामायणातील श्रवण बाळा किंवा महाभारतात राजा ययातीचे उदाहरण जरी पौराणिक असले तरी, याचा संदेश आजच्या काळातही तितकाच महत्त्वाचा आहे: आई-वडिलांची सेवा आणि कर्तव्य रक्ताच्या नात्यापेक्षा मोठे आहे.

संपत्तीच्या लोभात नाते विसरणाऱ्या मुलांसाठी हा निकाल स्पष्ट संदेश देतो की कायद्याची नजर कोणालाही फसवणूक किंवा गैरव्यवहार करू देत नाही.

तसेच, 'मेंटेनन्स अँड वेल्फेअर ऑफ पेरेंट्स अँड सिनिअर सिटीझन्स कट, २००७' या कायद्याचा प्रभाव आणि समाजात त्याचे महत्त्व अधोरेखित करते. यामुळे केवळ वडिलांसाठीच नाही तर समाजातील इतर ज्येष्ठ नागरिकांसाठीही हा एक आधारस्तंभ ठरेल.

या घटनेतून नागरिकांनी लक्षात घ्यायला हवे की कौटुंबिक मूल्ये जपणे आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांची संरक्षण करणे केवळ कर्तव्य नाही, तर समाजातील नैतिकतेचा मूलभूत आधार आहे. उच्च न्यायालयाचा हा निकाल एक चेतावणी आणि प्रेरणा दोन्ही आहे - जेथे सन्मान आणि मानवतेपेक्षा संपत्तीला महत्त्व दिले जाते, तेथे कायदेशीर संरक्षण आणि न्याय निश्चितच सुनिश्चित केला जातो.

नैसर्गिक अनुदान घोटाळ्यात सहाय्यक कृषी अधिकाऱ्याचा सहभाग; आर्थिक गुन्हे शाखेकडून अटक

आत्ताच एक्सप्रेस

अंबड / प्रतिनिधी/अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे पीकधारक शेतकऱ्यांना झालेल्या मोठ्या आर्थिक नुकसानीमुळे शासनाने दिलासा देण्यासाठी चार वेगवेगळ्या जीआर काढून आर्थिक अनुदान जाहीर केले होते.

मात्र, या अनुदानाच्या वाटपात बोगस नावे अपलोड करून सरकारी निधीचा गैरवापर केल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्याने जिल्हा प्रशासनात मोठा गदारोळ उडाला.

तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाचा सखोल अभ्यास करण्यासाठी चौकशी समिती गठित केली. समितीने केलेल्या तपासणीत २४० गावांमध्ये तब्बल २४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय निधीचा गैरफायदा झाल्याचे निष्पन्न झाले. या निष्कर्षानंतर पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा नोंदवण्यात आला आणि इछड कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५२ व ५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तपास अधिक प्रभावी करण्यासाठी हा प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे हस्तांतरीत करण्यात आला. याआधीच ७ आरोपींना अटक करण्यात आली असून तपास सुरु आहे.

तपासादरम्यान घनसावंगी तालुक्यातील काही गावांमध्ये - राजणी वाडी, भुतेगाव, कृष्णानगर - पिकपाहणी पंचनामे तयार करणे आणि बाधित शेतकऱ्यांची नावे अपलोड करण्याच्या कामात सहाय्यक कृषी अधिकारी केशव गंगाधर कचकलवाड (वय ३४) यांचा सक्रिय सहभाग असल्याचे समोर आले.

आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने इंदेवाडी येथील त्यांच्या घरावर छापा टाकून त्यांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान या कारवाईत पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, आणि प्रभारी उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा श्री सिद्धार्थ माने यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले गेले. या कारवाईत सहा पोलीस निरीक्षक, अनेक पोलीस अंमलदार, तसेच महिला अंमलदार यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

केशव कचकलवाड यांच्या ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याविरुद्ध अधिक तपास सुरू असून, त्यांचा आणि इतर आरोपींचा आर्थिक लाभ आणि गुन्ह्याच्या पद्धतींचा सखोल अभ्यास केला जात आहे.

पोलिसांनी ही कारवाई शेतकरी हितासाठी व सरकारी निधीच्या संरक्षणासाठी केली असून, शासकीय निधीचा गैरवापर रोखण्यासाठी आणि दोषींना कारवाईचा सामना करावा लागेल याची दक्षता घेतली जात आहे.

याशिवाय, या प्रकरणात सहकार्य करणाऱ्या पोलीस पथकाच्या सदस्यांनी विविध गावांमध्ये तपासणी करत दोषी आणि पीडित शेतकऱ्यांच्या माहितीची पडताळणी केली, ज्यामुळे गुन्ह्याचा स्वरूप अधिक स्पष्ट झाला. आर्थिक गुन्हे शाखा पुढील तपास सुरू ठेवून, निधीच्या अपहरणात सहभागी असलेल्या सर्व आरोपींच्या माहितीवर लक्ष केंद्रित करत आहे, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवली जातील.

स्वातंत्र्य सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी

आत्ताच एक्सप्रेस

जालना (प्रतिनिधी) महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारस व पाल्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. ही मागणी स्वातंत्र्य सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात कोलते यांनी नमूद केले आहे की, महाराष्ट्रात सध्या राज्य व केंद्र सरकारच्या योजनेतून सुमारे १७ हजाराहून अधिक स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या वारस/पत्नी आहेत, ज्यापैकी जवळपास ५ हजाराहून अधिक निवृत्ती वेतन घेत आहेत. मात्र, मरण पावलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील वारस मुला-मुलींना त्यांच्या कार्याची आठवण ठेवता यावी आणि त्यांचे प्रश्न सोडवता यावेत, यासाठी महामंडळ स्थापन करणे गरजेचे आहे.

कोलते यांनी म्हटले आहे की, आजही १९९१ च्या शासन निर्णयानुसार नावनिर्देशित व्यक्तींना शासन सेवेत समाविष्ट करण्याचे प्रश्न प्रलंबित आहेत. याशिवाय, महाराष्ट्रात भाजपा महायुती सरकारच्या कार्यकाळात ५२ हून अधिक आर्थिक विकास महामंडळ स्थापन झाल्यामुळे समाजातील दुर्बल घटक व वंचितांच्या समस्यांचे निराकरण झाले आहे.त्यामुळे स्वातंत्र्य सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना व पाल्यांना न्याय देणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

वारकरी संत साहित्य संमेलनात रंगणार 'कीर्तावनी'

आत्ताच एक्सप्रेस

जालना/प्रतिनिधी/मराठी संस्कृतीच्या सखोल पाया असलेल्या वारकरी संप्रदायाचा केवळ भक्तीमय अनुभव नव्हे, तर त्याचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विचारधारेवर होणारा प्रभाव यावर प्रकाश टाकणारा एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम लवकरच जालना शहरात आयोजित होणार आहे.मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जेईएस महाविद्यालयात १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी वारकरी संत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, या संमेलनाचे अध्यक्ष जगतगुरू द्वाराचार्य विद्यावाचस्पती रामकृष्णदास लहावितकर राहणार आहेत. संमेलनात रसिकांचे लक्ष वेधून घेणारे आणि वारकरी संप्रदायाच्या वैचारिक, सांस्कृतिक आणि भक्तीपरंपरेला सजीव करणारे सादरीकरण म्हणजे 'हिमशिखा, पुणे' निर्मित विशेष संगीत-नाट्यप्रयोग 'कीर्तावनी'. हा प्रयोग पहिल्या दिवशी, शुक्रवार, १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रेक्षकांसमोर मांडला जाणार आहे.

'कीर्तावनी': परंपरा आणि आधुनिकतेचा अद्वितीय संगम

'कीर्तावनी' हा प्रयोग केवळ नाट्यप्रदर्शन नसून, महाराष्ट्रातील दोन प्रमुख लोककला प्रकार - कीर्तन आणि लावणी-बतावणी यांचा सर्जनशील मिलाफ आहे. या प्रयोगात 'वारी आडवाटंच्या विठोबाची' कथा नाट्य, गायन, कथाकथन आणि अभिनयाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर मांडली जाते. वारकरी संप्रदायाला भावनिक दृष्ट्या अत्यंत गहन मानले जाते, मात्र 'कीर्तावनी' प्रेक्षकांना दाखवते की हा संप्रदाय केवळ भक्तीपुरता मर्यादित नाही, तर तो सर्वव्यापी आणि जीवनाला मार्गदर्शन करणारा आहे.

या प्रयोगात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यापासून ते आधुनिक काळातील साने गुरुजी पर्यंतच्या विचारांचा सखोल मागोवा घेतला आहे. संतसाहित्याने महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनावर दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकताना, यातील संदेश आपल्या आजच्या जीवनाशी कसा जुळवता येईल, हे 'कीर्तावनी' प्रेक्षकांसमोर उलगडते.

संगीत, नाट्य आणि लोककलेचा वैभव

सलग पावणेदोन तासांच्या या प्रयोगात नाट्य, निवेदन, कथाकथन आणि गायनाच्या माध्यमातून लावणी, सवाल-जवाब, कटाव, अभंग, भारुड, कव्वाली, पोवाडा अशा बहुविध लोककला प्रकारांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. प्रत्येक कलाकृतीचा समावेश प्रेक्षकांना केवळ मनोरंजन देत नाही, तर त्यांच्या मनात संतांच्या विचारांचा सकारात्मक प्रभाव आणि जीवनसूत्र निर्माण करतो.

या प्रयोगाचे लेखन-दिग्दर्शन ऋचिका खोत यांनी केले असून, अभिनयाचे मुख्य भाग ऋचिका खोत आणि स्वामीराज भिसे यांनी साकारले आहेत. त्यांच्या सजीव अभिनयामुळे कथा आणि संदेश अधिक प्रभावी आणि भावपूर्णपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो.आयोजकांनी संमेलनात सहभागी होण्याचे विशेष आवाहन केले असून, प्रेक्षकांना वारकरी संप्रदायाच्या बहुआयामी, सांस्कृतिक आणि भक्तीमय अनुभवाचा थेट अनुभव घेता येणार आहे, जो त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात नव्या विचारांची पायाभरणी करेल.'कीर्तावनी' हा प्रयोग फक्त नाट्यप्रदर्शन नाही, तर एक सांगीतिक प्रवास आणि जीवनदर्शन आहे, ज्यामध्ये प्रेक्षक संतसाहित्याच्या मार्गदर्शनाखाली आपल्या जीवनातील मूल्यांची आणि संस्कृतीची गहन समज विकसित करू शकतात.

प्रभाग क्र.७ मध्ये सिमेंट रस्ते व नाली बांधकामाचे हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

आत्ताच एक्सप्रेस

केज/प्रतिनिधी /केज शहरातील महात्मा फुले नगर भागातील प्रभाग क्रमांक ७ मधील सिमेंट रस्ते व नाली बांधकामाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. यावेळी या भागातील नागरिकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे, ज्येष्ठ नागरिकांचे व पत्रकार बांधवांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.याप्रसंगी बोलताना ज्येष्ठ नेते हारूणभाई इनामदार सांगितले की, प्रभाग क्रमांक ७,८,९, मध्ये सध्या सिमेंट रस्ते व नाली आणि पाईपलाईनची कामे मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. काही ठिकाणी थोडेफार रस्त्याचे व नालीची कामे बाकी आहेत तेही लवकरच पूर्ण करणार आहोत. आम्ही या भागातील नागरिकांना जो दिलेला शब्द आहे तो शब्द आज रोजी आम्ही पूर्ण करीत आहोत. उर्वरित राहिलेल्या कामापैकी येत्या पंधरा दिवसांमध्ये चार सिमेंट रस्त्याच्या व नाली बांधकामाचे उद्घाटन करून प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात येणार आहे. यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी सांगितले की, महात्मा फुले नगर हा भाग माझा असून मी या भागाची रहिवासी आहे व प्रभाग क्रमांक ७ हा माझा प्रभाग आहे. फुलेनगर मधील रस्त्याच्या व नालीच्या बांधकामसह पाईपलाईनची कामे पूर्णतत्त्वाकडे गेलेले आहेत प्रभाग सात मध्ये फक्त दोन-तीन रस्ते करण्याचे बाकी आहेत तेही लवकरच पूर्ण करणार आहोत. आमच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड म्हणाल्या की, महात्मा फुले नगर या भागात वाढती लोकसंख्या व येथील नागरिकांची पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून आम्ही नवीन सहा बोरवेल मंजूर केलेले आहेत लवकरच नवीन बोरवेल घेऊन पाईपलाईन करून नागरिकांना पाणीपुरवठा करून देणार आहोत. पुढे बोलताना बनसोड म्हणाल्या की, या भागातील काही नागरिकांना पाण्याची अडचण भासल्यास त्यांना तात्काळ बोरवेल घेऊन देऊन त्यांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लावू असे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोडे यांनी आश्वासित केले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड,गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेविका सौ. पद्मिनी अक्का शिंदे, ज्येष्ठ नागरिक नवनाथ धीवार सर, पाशाभाई शेख, पत्रकार तात्या गवळी, युवा नेते शाहरुख पटेल, डॉ. नौशाद शेख, पत्रकार विवेक बनसोड, बालासाहेब जोगदंड, नितीन धीवार, धम्मानंद गायकवाड, ज्येष्ठ नागरिक, आश्रुबा जोगदंड , जतीन धीवार, अशोक क्षीरसागर, राहुल इनकर, सुहास समुद्रे, अशोक धीवर, किरण जोगदंड, आशुभाई शेख, ज्येष्ठ नागरिक आत्माराम मस्के,सुशिल रोकडे, भाग्यश्री गायकवाड, सोनालीताई समुद्रे, कौशल्य मस्के यांच्यासह या भागातील महिला, नागरिक, युवक व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813